महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

बुधवार दि.१५ एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २४१ किंमत २ रुपये 7499615933

# जागतिक अर्थव्यवस्थेत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आजही कालसुसंगत-मुख्यमंत्री फडणवीस

## दादरच्या चैत्यभूमी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हे समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. त्यांच्या विचारांमुळेच वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांना आत्मसन्मान, समान संधी, न्यायाचा मार्ग मिळाला आहे. संविधानातील घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त झाली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महापौर रितू तावडे उपस्थित होते.राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीतही डॉ. आंबेडकर अग्रणी होते. महिलांना शिक्षण, संपत्ती आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या योगदानामुळेच भारत प्रजासत्ताक झाल्यापासून महिलांना समान मतदानाचा अधिकार मिळाला. महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होत असून, या निमित्ताने जातीयतेपासून मुक्त आणि भेदभावविरहित समाज घडविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक दृष्टिकोन, चलनव्यवस्था आणि आर्थिक स्थैर्य याविषयीचे विचार आजही कालसुसंगत आहेत. जागतिक पातळीवर अर्थकारणात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधिक असल्याचे सांगून जागतिक अर्थव्यवस्थेतही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील त्यांच्या संशोधनातून डॉ. आंबेडकरांनी भारतात केंद्रीय बँकेची गरज अधोरेखित केली होती. त्यांच्या विचारांवर आधारितच पुढे रिझर्व बँक ऑफ इंडिया ची स्थापना झाली. तसेच 'गोल्ड स्टँडर्ड' आणि चलनाच्या खरेदी शक्तीबाबत त्यांनी मांडलेले विचार आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतही मोलाचे ठरत आहेत. त्यांच्या 'प्रॉब्लेम्स ऑफ रुपी' या प्रबंधातून रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचा पाया रचला गेला. १९२३ मध्ये डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या आर्थिक विचारांच्या आधारावरच आज जग वाटचाल करत आहे. त्यांच्या प्रबंधात मांडलेल्या तत्त्वांवरच भारताची अर्थव्यवस्था उभी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हाच आपला राष्ट्रधर्म असून बाबासाहेब हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नसून माणुसकीचेही शिल्पकार आहेत. त्यांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे देशातील शेवटच्या माणसालाही न्याय आणि सन्मान मिळण्याचा मार्ग सुकर झाला, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. महापुरुष शांततेतून जेव्हा कृती करतात, तेव्हा ती क्रांती ठरते. महाड चवदार तळे सत्याग्रहातून समाजात आत्मसन्मानाची जाणीव निर्माण झाली. बाबासाहेबांनी



आयुष्यभर शोषित, दलित आणि वंचित घटकांसाठी काम करून त्यांना सक्षम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे भारताची लोकशाही जगात भक्कमपणे उभी आहे. इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम वेगाने सुरू असून हे स्मारक पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.भारतभर साजरी होणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही स्वाभिमान आणि विवेकाचा उत्सव असून त्यांचे विचार जपणे आणि ते आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ही प्रेरणा, संकल्प आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा तसेच त्यांच्या विचारांचे स्मरण करण्याचा दिवस आहे. डॉ. आंबेडकर यांच्या मानवकल्याणाच्या विचारांना पुढे नेणे आणि समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन देशाचा सर्वांगीण व वेगवान विकास साधणे हेच त्यांना खरे अभिवादन असल्याचे त्यांनी सांगितले. चैत्यभूमी ही बाबासाहेबांच्या विचारांचे ऊर्जा केंद्र असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदेतज्ज्ञ, घटनातज्ज्ञ आणि अर्थतज्ज्ञ होते. एकता, समता आणि बंधुता या मूल्यांमध्ये समाजाला बांधून त्यांनी प्रत्येकाला सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांची मशाल सतत तेवत ठेवून त्यानुसार आचरण करणे गरजेचे आहे. इंदू मिलच्या जागेवर उभारण्यात येत असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक जगाला शांतता आणिसमतेचा संदेश देणारे केंद्र ठरेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला. सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांनी पुष्प अर्पण करून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन केले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते सर्व भिक्खूंना चिवरदान देण्यात आले. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली. यावेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या एक वर्षाच्या कामकाजावर आधारित 'समाजनायक संजय शिरसाट' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी यावेळी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास आमदार कालिदास कोळंबकर, आमदार दीपक केसरकर, आमदार सना मलिक, माजी खासदार राहुल शेवाळे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे माजी खासदार राहुल शेवाळे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर, भन्ते डॉ.राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आदींसह समाजाच्या सर्वक्षेत्रातील मान्यवर तसेच डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाचोड खुर्द येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

पाचोड खुर्द (ता. पैठण) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पाचोड खुर्दचे सरपंच विठ्ठल होले तसेच जि.प. शाळेचे मुख्याध्यापक रेवलसिंग शिखरे सर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करून समाजाला एकजूट, शिक्षण व प्रगतीचा संदेश दिला.या प्रसंगी उपसरपंच नितीन वाघ,



दिलीप वाघ, धनंजय वाघ, किर्ती गडवे, अर्जुन शेळके, कृष्णा जाधव, संतोष शेळके, सतीश वाघ, बप्पासाहेब वाघ, शिवाजी शेळके, अशोक शेळके, भीमराव गडवे, शरद शेळके, मुरलीआबा शेळके, अर्जुन गडवे, दादाराव शेळके, रमेश शेळके, रोहिदास शेळके राजू ढवळे इत्यादी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या विचारांवर आधारित प्रेरणादायी भाषणे देण्यात आली. संपूर्ण वातावरण जय भीम च्या घोषणांनी दुमदुमून गेले आणि कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.



१४एप्रिल २०२६ रोजी युगपुरुष भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती प्राथमिक आरोग्य केंद्र कोठारी (सि ) ता किनवट जि.नांदेड येथे साजरी करण्यात आली या वेळी डॉ गजानन काळे, डॉ. गजानन तायवाडे वै अधिकारी व श्रीमती घोगारी ङक्त श्री. कुंटूरवार HA श्री. पडघनकर MPW श्रीमती धर्मेकर ANM् आणि श्रीमती. कनाके परिचर हजर होते. त्यानिमित्ताने महामानवास कोटी कोटी प्रणाम

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तळेगावची विमानवारी कार्यक्रमाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित केलेली तळेगावची विमानवारी, स्वप्नाची गगनभरारी ही अंतिम परीक्षा अत्यंत उत्साहात संपन्न झाली. सर्वप्रथम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष विश्वजीत देशमुख तसेच आनंदा रेडी कपावर,आवेश सर, हनुमंत किनेवाड, मा. सरपंच दिगंबर इंगळे, गणेश इंगळे, अनिल वाघमारे,जिल्हा परिषद शाळेचे शेख सर, लोखंडे गौतम, मु. अ. सुरकुटवार सर, हिवराळे सर, गोदावरी शिक्षण संस्था तळेगाव च्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा आणि बाबासाहेबांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या संदेशाला कृतीत उतरवण्याचा एक स्तुत्य उपक्रम ,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा किंवा इतर क्षेत्रांत 'गगनभरारी' घेण्यास प्रवृत्त करणे.तळेगावातील ३२ विद्यार्थ्यांनी या अंतीम परीक्षेत आपला सहभाग नोंदवून आपल्या ज्ञानाची आणि कष्टाची 'इमानवारी' सिद्ध केली. यापूर्वी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी पूर्व परीक्षा घेण्यात आली. महापुरुषांच्या जयंतीनिमित्त केवळ उत्सवी



स्वरूप न ठेवता, शैक्षणिक उपक्रम राबवून महामानवाला खरी आदरांजली वाहण्यात आली.अशा स्पर्धांच्या माध्यमातून जेव्हा एखादा विद्यार्थी परीक्षेत यश मिळवतो, तेव्हा तो केवळ स्वतःचेच नाही तर संपूर्ण समाजाचे स्वप्न पूर्ण करत असतो. या परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव येत्या काळात मोठ्या समारंभात केला जाईल, ज्यामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल. आयोजकांनी घेतलेली ही मेहनत तळेगावच्या शैक्षणिक इतिहासात एक मैलाचा दगड ठरेल यात शंका नाही.असे मत युवा नेतृत्व तथा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष विशवा देशमुख तळेगावकर यांनी मांडले आहे.

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त खीरदान श्री दत्तकृपा प्रतिष्ठान येथे मान्यवरांच्या उपस्थितीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती सह खीरदान कार्यक्रम संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । डॉ.भारत उद्धव राठोड**

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त माहूर शहरात ठिकठिकाणी अभिवादन करण्यात आले तर तहसील कार्यालयाचा गेटवर असलेल्या स्वर्गीय पिपळी बाई पूरसिंग राठोड यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रशांत भाऊ राठोड यांनी उभारलेल्या श्री दत्तकृपा प्रतिष्ठान येथे संचालक विजय भाऊ कांबळे यांचे कडून जयंती साजरी करत आलेल्या सर्व नागरिकांना दिवसभर खीरदान करण्यात आले

माहूर शहरात अन्नदान करण्यासाठी प्रसिद्ध असलेले विजय भाऊ कांबळे यांच्या श्रीदत्त कृपा प्रतिष्ठान येथे झालेल्या जयंती व खिरदान कार्यक्रमात शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून खीर प्राशन केली यावेळी माजी जि प सभापती संजय राठोड शिवसेनेचे तालुका अध्यक्ष सुदर्शन नाईक भाजपाचे डॉ निरंजन केशवे अनिल वाघमारे ज्येष्ठ पत्रकार नंदू संतान व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष पत्रकार विजय आमले व्यापारी संघटनेचे अध्यक्ष कुंदन भाऊ राठोड पत्रकार संघाचे अध्यक्ष सरफराज दोसानी पत्रकार वसंतराव कपाटे



पत्रकार गजानन भारती पत्रकार दत्तात्रय शेरेकर फिरोज पठाण ( तालुका प्रतिनिधी. डॉ.भारत उद्धव राठोड कणकीकर ) संजय बनसोडे एड धीरज शेंडे व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष इलियास बावाणी शिवचरण राठोड संजय बनसोडे वसंत राठोड दिगंबर जोशी दिगंबर राठोड नितीन जांबुतकर कदिर बावाणी शेख सलीम प्रताप हजारे लक्ष्मीकांत उर्फ पिंटू पाटील शिवसेनेचे संघटक विनोद पाटील सूर्यवंशी बालाजी गेंटलवार उदय वानखेडे गोपाल नाईक नयनसिंह राठोड नवल वानखेडे प्राचार्य बाळू कलाने गजानन शद्दलवार तथागत मनवर दीपक ठाकूर बंडूभाऊ राठोड पालागुडाकर दयाळू जाधव बंडू चव्हाण बाजीराव जाधव रमेश रत्नसींग चव्हाण पानोळा प्रफुल भाऊ जाधव गोरसेना कार्यकर्ते यांचे सह शेकडो नागरिकांनी खिरदान कार्यक्रमाचा आनंद घेतला

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शहरात ठिकठिकाणी अभिवादन करण्यात आले तर भव्य मिरवणुकी द्वारे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचे मूर्तिमंत प्रतीक-नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी

## परळीत ठिकठिकाणच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमांना उपस्थित राहून अभिवादन





लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ज्ञानाचा अथांग सागर होते. खऱ्या अर्थाने ते ज्ञानाचे मूर्तिमंत प्रतीक आहेत. न्याय, समता, बंधुता या विचारानेच देशाची प्रगतीकडे वाटचाल होणार आहे. आपण सर्वांनी बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा आपल्या कृतीत आणायला हवा, असे प्रतिपादन परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ठिकठिकाणी आयोजित कार्यक्रमात अभिवादन व विचार व्यक्त करताना केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त परळी वैद्यनाथ शहरातील रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास माजी मंत्री आ.धनंजय मुंडे व सहकाऱ्यांच्या समवेत पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केले. तसेच परळी शहरातील भीम नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या जयंती कार्यक्रमात शालेय साहित्य वाटप कार्यक्रमास उपस्थित राहून शालेय साहित्याचे वितरण केले. परळी वैजनाथ नगर परिषद कर्मचाऱ्यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख उपस्थित राहून आपलं मनोगत व्यक्त करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची देशाला अत्यंत गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्याचबरोबर रेल्वे कर्मचारी यांच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रमात प्रमुख उपस्थित रहात त्यांनी महामानवाला अभिवादन केले. शहरातील ठीकठिकाणच्या बुद्ध विहार व ठिकठिकाणी आयोजित भीम जयंती कार्यक्रमानिमित्त भेटी देऊन महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले .आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते आजच्या शुभमुहूर्तावर मिलिंद नगर येथे उभारण्यात आलेल्या भव्य नालंदा बुद्ध विहाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. ठिकठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रम, जयंती कार्यक्रमास नगरपरिषदेतील सहकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेंद्रा ग्रामपंचायत कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी




लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ.संभाजीनगर । डॉ.ज्ञानदेव चेपटे**

छत्रपती संभाजीनगर-दि.१४एप्रिल:शेंद्रा चळवल ग्रामपंचायत येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शेंद्रा ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात महामानवास अभिवादन करण्यात आले.आज सकाळी ठीक १०.०० वाजता. मांगीर बाबा देवस्थानचे अध्यक्ष श्री.भास्कर कचकुरे,गावचे सरपंच सौ.पुष्पा नामदेव कचकुरे,माजी सरपंच श्री.रमेश जाधव,यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सरपंचांच्या पूजनानंतर उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी आणि ग्रामपंचायत सदस्यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि त्यांनी संविधानाच्या माध्यमातून दिलेले हक्क यावर यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी या कार्यक्रमास श्री.सरपंच नामदेव कचकुरे,उपसरपंच श्री.सर्जेराव पाटील कचकुरे, माजी सरपंच श्री.रमेश जाधव, ग्रामपंचायत अधिकारी चव्हाण साहेब, ग्रामपंचायत सदस्य श्री.शंकरभाऊ नाईकवाडे, मांगीर बाबा देवस्थान समितीचे सचिव श्री.सुरेश नाईकवाडे व युवा नेते श्री.बाबासाहेब कचकुरे, बाबाभाई पठाण श्री.मनोज पाटील कचकुरे,श्री.गजानन कचकुरे, श्री.सोमनाथ खरात,किशोर कचकुरे,श्री.योगेश शेजुळ,व सर्व आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य आणि सर्व ज्येष्ठ ग्रामस्थांची उपस्थिती होती. आदी मान्यवर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, अधिकारी, पदाधिकारी व प्रगतशील बागायतदार तसेच पंचशील बुद्ध विहार प्रतिष्ठानचे सर्व मेंबर्स, सर्व समाज बंधू व गावातील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीत हा जयंती सोहळा अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## गुळखेडावाडी येथे अचानक लागलेल्या आगीत घर जळून खाक, आगीत घर जळाल्याने मोठे नुकसान झाले अंदाजे३ ते साडेतीन लाखांचे साहित्य जळून खाक




लोकनेता न्यूज नेटवर्क

**औसा । महेश कोळी**

औसा तालुक्यातील गुळखेडा वाडी येथील अशोक भागवत तळेकर यांच्या घरात अचानक लागलेल्या आगीत घरातील जीवनावश्यक वस्तू सह घरांतील सहित्य जळून जळून खाक झाल्याची घटना औसा तालुक्यातील गुळखेडा वाडी येथे १४एप्रिल २०२६रोजी दुपारी घडली. या घरातील कुटुंब शेतीत काम व बांधकाम काम करून आपले घर चालवत होते.ते दररोजच्या प्रमाणे कामाला गेले असताना घरी अचानक आग लागली. हे घर बंद असल्याने सर्व नुकसान झाले.मात्र सुदैवाने जीवितहानी टळली. घरातून आगीचा धूर व ज्वाला दिसताच आजूबाजूच्या ग्रामस्थांनी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, रौद्र रूप धारण केल्याने आगीवर नियंत्रण मिळविणे शक्य झाले नाही. त्यामुळे काही क्षणांत संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.अचानक लागलेल्या आगीत घरातील जीवनावश्यक वस्तू, फ्रिज,कपाट, तसेच जीवनावश्यक साहित्य व बांधकाम काम करत असल्याने ते सर्व साहित्य,भांडे, अन्नधान्य, कपडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.त्यामुळे आगीत घर जळाल्याने मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये घरातील भांडीकुंडी, कपडे, अन्य साहित्य जळून खाक झाले.आगीबाबत ग्रामस्थांनी तलाठी एम ए तसेच ग्रामसेवक सचीन कुरकूट यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित घटनेचा पंचनामा केला असून जवळपास अंदाजे ३ते साडेतीन लाखांचे नुकसान झाले असल्याचे बोलले जात आहे. कुंटूबात एकूण ७ जण असून घरांतील सर्व साहित्य जळून खाक झाल्याने शासनाने तात्काळ लक्ष देऊन सहकार्य करावे अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल मुलींचे मुखेड येथे १८ तास सलग अभ्यास उपक्रम दिनांक १३/४/२०२६ रोजी राबविला गेला. हे अभियान महामानवाच्या ज्ञानसाधनेला अभिवादन आणि विद्यार्थी मध्ये वाचन व एकाग्रता वाढवण्यासाठी केला जातो. १८ तास अभ्यास उपक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, उद्देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञानाची तळमळ, संघर्ष आणि त्यांच्या २२ हजार पुस्तकांचा आदर्श विद्यार्थी समोर ठेवणे हा होता. या प्रसंगी शाळेचे आदर्श मुख्याध्यापक श्री एस. बी. राजपूत, सांस्कृतिक विभाग प्रमुख डि. एन. देवकांबळे,यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले**

## भोकर हिमायतनगर किनवट राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण काढण्यात यावे-त्रिरत्नकुमार भवरे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ ए भोकर हिमायतनगर किनवट वरील हॉटेल पानटपरी पत्राचे शेड किंवा अवजारे रोडच्या कडेला ठेवून अतिक्रमण होत असल्यामुळे ते लवकरात लवकर काढण्यात यावे अशा पध्दतीचे निवेदन बहुजन टायगर युवा फोर्सच्या वतीने त्रिरत्न कुमार भवरे यांनी अधिक्षक अभियंता नांदेड यांना दिले

याबाबत सविस्तर वृत्त असे की भोकर हिमायतनगर किनवट राष्ट्रीय महामार्गावर हॉटेल पानटपरी पत्राचे शेड किंवा शेती विषयक अवजारे रोडच्या बाजूला ठेवून अतिक्रमण वाढत असल्यामुळे अनेक अपघात घडत आहेत अनेकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत त्यामुळे प्रशासनाने महामार्गावरील अतिक्रमण काढुन प्रत्येक गावच्या ठिकाणी गतीरोधक टाकावे व दर दोन महिन्यांनी अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यात यावी अशा पध्दतीचे निवेदन अधिक्षक अभियंता नांदेड यांना दिले.कार्यवाही नाही झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा त्रिरत्नकुमार भवरे यांनी दिला.




**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती ऋतढ कृषीकुल येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे ट्रस्टी संजय परमार यांनी डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांनीही पुष्पांजली अर्पण करत आपल्या भावना व्यक्त केल्या.**

## श्री क्षेत्र चोंडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप




लोकनेता न्यूज नेटवर्क

**धारूर । प्रदीप मुंडे**

श्री क्षेत्र चोंडी येथील जिल्हा परिषद शाळा, चोंडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कल्याण हजारे मित्र मंडळ यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रुद्रे सर होते. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. तसेच सरपंच.उपसरपंच.चेअरमन.पोलीस पाटील गणेश मुंडे, युवा नेते सोमनाथ मुंडे, युवा नेते युवराज मुंडे, पत्रकार प्रदीप मुंडे, कल्याण हजारे, भरत मुंडे व अनेक पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षण हेच खरे सामर्थ्य असल्याचे सांगितले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल तसेच इतर आवश्यक शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्यासाठी असे उपक्रम सातत्याने व्हावेत, अशी भावना उपस्थित पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आल

## भीमज्योतीने दुमदुमला गडचांदूर! १३५ व्या जयंतीनिमित्त प्रभागात अभिमानाची मानवंदना



लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपुर । सिद्धेश्वर केंद्रे**

प्रभाग क्रमांक ९ मधील मुक्तीधाम परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज सुधारक मंडळाच्या वतीने अत्यंत उत्साहात व जल्लोषात कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. यानंतर पंचशील ध्वज फडकावून समता, बंधुता आणि न्यायाचा संदेश देण्यात आला. जय भीमच्या घोषणांनी संपूर्ण परिसर भीममय झाला होता.

या प्रसंगी आयु. चंद्रकांत (मामा) वाठोरे यांच्या हस्ते उपस्थित नागरिकांना मसाला भात व कढीचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले.

कार्यक्रमाला नगरसेवक सतीश बेतावार, प्रा. हेमचंद दूधगवळी, रवी ताकसांडे, प्रेम वानखेडे, महेश ससाने, पंकज गावंडे, विलास भडके, गणेश नरवडे, चंद्रकांत वाठोरे, केवल राम बनसोड, रवी मुनेश्वर, अशोक शिकारे, सोनू भडके तसेच प्रभागातील आयुष्यमान व आयुष्यमती नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करत समाज प्रबोधनाचा संदेश देण्यात आला

# उन्हाचा पारा चढला किनवटच्या बाजारपेठेत 'कुलर'ची हवा कुलर खरेदीसाठी ग्राहकाची लगबग

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट | शेख शौकत**

मार्च महिना संपला असून उन्हाची तीव्रता आता जाणवू लागली आहे. एप्रिल महिण्याच्या सुरुवातीपासूनच किनवट शहरात तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. या कडाक्याच्या उन्हापासून बचाव करण्यासाठी बाजारपेठेत विविध कंपन्यांचे आणि विविध आकाराचे कुलर विक्रीसाठी दाखल झाले असून नागरिकांनी आता थंडाव्यासाठी खरेदीला सुरुवात केली आहे.

कुलरच्या वाढत्या मागणीचा विचार करून व्यापाऱ्यांनी बाजारपेठेत छोटे, मोठे आणि मध्यम अशा सर्वच आकाराचे कुलर उपलब्ध करून दिले आहेत. निपोतनः 'गोर्तेनल कलर' शाणि'टॉवर कुलर' यांना तरुण वर्गातून अधिक पसंती मिळत आहे. दुकानदारांनी आपल्या दुकानांसमोर आकर्षकपणे कुलरची मांडणी केली असून, यामुळे ग्राहकांचे लक्ष वेधले जात आहे. काही दुकानांनी तर उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच

दुकानांमध्ये गर्दी दिसून येत आहे. फायबर बॉडी आणि लोखंडी बॉडी अशा दोन्ही प्रकारचे कुलर विक्रीसाठी उपलब्ध आहेत. ३ हजार रुपयांपासून ते १५ हजार रुपयांपर्यंतचे कुलर ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत. घरासोबतच कार्यालयांसाठी मोठ्या कुलरची मागणी वाढली आहे.'दरवर्षीच्या तुलनेत यंदा उन्हाचा चटका लवकर जाणवू लागल्याने ग्राहकांनी कुलर खरेदीला गर्दी केली आहे. आम्ही ग्राहकांच्या पसंतीनुसार आधुनिक डिझाइन आणि कमी विजेचा वापर करणारे कुलर विक्रीस ठेवले असल्याने कुलर विक्रेत्यांनी सांगितले आहे.

शहरापासून दूर असल्याने ग्रामीण भागातील नागरिक हे शहरात जातात कुलर खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत येत असतात, असेही त्यांनी सांगितले आहे.



## जिल्हा परिषद बऱ्हाणपूर शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी; वाचन उपक्रम व खाऊवाटप

लोकनेता न्यूज नेटवर्क


**भूम | रविंद्र लोमटे**

येथील जिल्हा परिषद शाळा बऱ्हाणपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

युवासेना पांडुरंग धस यांचा हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी ग्रामसेवक किरण आलापुरे,मुख्याध्यापक, शिक्षक, शालेय शिक्षण समिती सदस्य, शिवसेना नेते नितीन पाटील, बालाजी मिसाळ,गणेश शेलार,व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विशेष आकर्षण ठरला तो विद्यार्थ्यांनी राबविलेला एक तास वाचन हा उपक्रम. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी विविध पुस्तके वाचून ज्ञानार्जनाचा संदेश दिला. वाचनामुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, याची जाणीव या उपक्रमातून करून देण्यात आली.

जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक आमदार तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना




सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते यांच्यावतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

मुख्याध्यापक बाबा पठाण व शिक्षिका सुनीता नवले आपल्या मार्गदर्शनातून डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व पटवून देत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश विद्यार्थ्यांनी जीवनात अंगीकारावा, असे आवाहन केले.

### 'आठवणींच्या साक्षीने उजळला निरोप समारंभ'

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एम. कॉम द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर | शिवाजी निरमनाळे**

दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एम.कॉम द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला. शिक्षणाचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण करून पुढील आयुष्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम आठवणींचा अमूल्य ठेवा ठरला. सदरील कार्यक्रम १३ एप्रिल २०२६ रोजी महाविद्यालय सभागृहात आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत



मान्नीकर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण तसेच वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयातील दोन वर्षांच्या आठवणींना उजाळा दिला. प्राध्यापकांचे मार्गदर्शन, मित्रमैत्रिणींसोबतचे क्षण, तसेच महाविद्यालयीन जीवनातील विविध अनुभव यांचा त्यांनी मनापासून उल्लेख केला. काही विद्यार्थ्यांनी भावनिक शब्दांत कृतज्ञता व्यक्त करताना डोळ्यांत पाणी आणले, तर काहींनी आनंददायी आठवणी सांगत वातावरण हलकेफुलके केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात प्रामाणिकपणा, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला. महाविद्यालयाने दिलेली शिस्त, ज्ञान आणि मूल्ये आयुष्यभर उपयोगी पडतील, असे ते म्हणाले. इतर मान्यवरांनीही विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अक्षय पवार यांनी प्रभावीपणे केले, तर शेवटी डॉ. मनीषा अष्टेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले

## हरडफ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती 'डीजे मुक्त' वातावरणात उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव | कृष्णा पाटील हरडफकर**

हरडफ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि आदर्शवत पद्धतीने साजरी करण्यात आली. यावर्षीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे गावकऱ्यांनी एकत्र येत ही जयंती डीजे मुक्त'** साजरी करण्याचा निर्णय घेतला होता. बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून व सामूहिक बुद्ध वंदना घेऊन गावांमध्ये मिरवणुक काढुन! अभिवादन करण्यात आले.

*मान्यवरांची उपस्थिती*

या सोहळ्याला परिसरातील अनेक मान्यवर आणि लोकप्रतिनिधींनी उपस्थिती लावली होती. यामध्ये:

* *पंजाबराव पाटील हरडफकर* (माजी जिल्हा परिषद सदस्य)
* *साईनाथ जिदेवाड* (ग्रामसेवक)
* *वंदना भागवत वाठोरे* (सरपंच)
* *बालाजी चंपतराव सूर्यवंशी* (सरपंच)
* *आकांक्षा वायवळ मॅडम*





(ग्रामपंचायत सदस्य)

* *विक्रांत वाठोरे, भगवान वाठोरे, शेषराव वाठोरे* (माजी ग्रामपंचायत सदस्य)

हदगाव पोलिस टेंशन चे बिड जेमादार! सुनिल वाघमारे साहेब! व युवा उद्योजक; माधव दादा वाठोरे! पंजाब वाठोरे तसेच, महिला बचत गटाच्या अध्यक्षा *मंगलताई वाठोरे, वंचित बहुजन आघाडीचे **ज्ञानेश्वर थोरात, धम्मदीक्षा मल्टी सर्व्हिसचे मालक **धम्मपाल वाठोरे, **आशिष वाठोरे* आणि *लखन वाठोरे*नवनाथ वाठोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

*विचारांचा जागर आणि संकल्प*

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या *समानता, न्याय आणि बंधुता* या त्रिसूत्रीचे स्मरण केले. केवळ जल्लोष न करता बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा आणि त्यांच्या आदर्शांवर चालण्याचा संकल्प यावेळी सर्व ग्रामस्थांनी केला. डीजेच्या आवाजापेक्षा बाबासाहेबांचे विचार घराघरात पोहोचवणे महत्त्वाचे आहे, हेच या जयंतीच्या निमित्ताने हरडफकरांनी सिद्ध केले आहे.या कार्यक्रमाला गावातील ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिस्तबद्ध नियोजन आणि वैचारिक वातावरणामुळे या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सौंदाना ग्रामपंचायत मधील झालेल्या भ्रष्टाचार संबंधी वारंवार तक्रार देऊनही कोणतीही कारवाई न केल्याने सिद्धेश्वर गायके यांनी केले आमरण उपोषणास सुरु

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

दि. १४ एप्रिल रोजी ग्रामपंचायत सौंदाना ता. जि. बीड येथील झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून दोषीवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी यासाठी श्री सिद्धेश्वर गायके सौंदाना गावातच बेमुदत आमरण उपोषणाला बसले आहेत.

शासनाला वेळोवेळी निवेदन देऊन सुद्धा याची दखल न घेतल्यामुळे शेवटी सिद्धेश्वर गायकेला आमरण उपोषणाला बसावे लागले. ज्यांच्यामुळे उपोषणाला बसावे लागले असे पुढील प्रमाणे मुद्दे आहेत.

१) जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे प्रलंबित असलेला सरपंच अपात्रतेचा निकाल तात्काळ देण्यात यावा.

२) गावातील व गावाच्या परिसरातील सर्व अतिक्रमण काढून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

३) जल जीवन मिशन अंतर्गत झालेल्या पाणीपुरवठा योजनेतील कंत्राट दारावर फौजदारी गुन्हे दाखल करून गावातील



पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा. जेणेकरून गावातील प्रत्येक नागरिकाला या पाण्याचा उपभोग घेता येईल.

४) वित्त आयोगातील भ्रष्टाचार करणाऱ्या ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडून शासनाच्या हडप केलेल्या पैशाची तात्काळ रिकवरी करावी.

५) ग्रामपंचायत सौंदाना कार्यालयामध्ये भ्रष्टाचार करण्यात आलेला ग्रामसेवक तात्काळ निलंबित करून कार्यमुक्त करावा.

६) माहिती अधिकार २००५ नुसार रीतसर माहिती मागूनही कोणतीही माहिती न दिल्याने संबंधित गट विकास अधिकारी यांच्यावर तात्काळ कार्यवाही करून, पुढील कार्यवाही करावी.

मागण्या घेऊन श्री सिद्धेश्वर गायके या १४ एप्रिल रोजी आमरण उपोषणाला सुरुवात करीत आहे तरी याची शासनाने दखल घ्यावी नसता याचे आणखी खूप गंभीर परिणाम शासनाला भोगावे लागतील याची सर्वस्वी जबाबदारी ही शासनाची राहिली याची जबाबदारी घ्यावी असे प्रसिद्धी पत्रकात श्री सिद्धेश्वर गायके यांनी म्हटले आहे.

## दुनगांव येथे महा मानवास अभिवादन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**दुनगाव | त्रिसिंग जायभाये**

ता.१४ ग्रामपंचायत कार्यालय दुनगांव येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी सरपंच श्री हसन भाई पठाण यांच्या हस्ते प्रतिमेश पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थिता मध्ये उपसरपंच श्री बबन मंडलिक पोलीस पाटील श्री अमोल जायभाये, संपादक दिव्य महाराष्ट्र न्युज श्री मुजीब पटेल, श्री बबनराव जायभाये, माजी पं समिती सभापती श्री शिवाजी कोल्हे, श्री जगन तात्या जायभाये,सत्तार सय्यद,श्री ज्ञानेश्वर(भावड्या )सिरसाट मा. शालेय व्य.स.अध्यक्ष तथा भावी सरपंच श्री प्रशांत (राजु) जायभाये,लिपिक श्री कृष्णा मंडलिक, ग्रा पं सेवक श्री सुभाष जायभाये,मन्सूर शेख आदी उपस्थिती होते.

## शेळगावच्या पंचशील बुद्ध विहार मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेळगाव | राहुल जाधव**

शेळगाव येथील पंचशील बुद्ध विहारामध्ये आज १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती सकाळी ९:३० मिनिटांनी अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला गावकऱ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात शेळगावच्या सरपंच यांच्या हस्ते करण्यात आली. त्यांनी भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून हार अर्पण केले. त्यानंतर विहारातील ध्वजाचे पूजन करून सरपंच सौ. उर्मिला शिंगाडे ग्रामपंचायत सदस्य वैशाली जाधव आणि स्वाती शिंगाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. सर्व समाज बांधवांकडून सरपंच सौ उर्मिला शिंगाडे, उपसरपंच रेश्मा जाधव व कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत जगताप यांचा आदरपूर्वक सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांचे



गुलाबाचे फुल देऊन आदरपूर्वक सन्मान करण्यात आला.नंतर चिमुकल्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर अभ्यासपूर्ण भाषणे करून सर्वांची मने जिंकली. कार्यक्रमात लक्ष्मण शिंगाडे, भजनदास पवार, डॉ. निलेश शिंगाडे, घाडगे गुरुजी आणि प्राचार्य सौ. मंगल वाघमोडे यांनी आपले विचार मांडले.कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरले ते जिल्हा परिषद शिक्षक उमेश सुपुते गुरुजी. सुपुते गुरुजींनी बाबासाहेबांचा संघर्ष आणि त्यांचे विचार मांडताना उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः काटा आणला. त्यांच्या शब्दाशब्दातून बाबासाहेबांप्रति असलेली कृतज्ञता झळकत होती, ज्यामुळे उपस्थितांचे डोळे पाणावले आणि वातावरण भारावून गेले.या जयंती उत्सवामुळे शेळगावमध्ये सामाजिक एकोपा आणि विचारांची ऊर्जा पाहायला मिळाली.

यावेळी या कार्यक्रमास सरपंच उर्मिला शिंगाडे, ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत जगताप, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत भुजबळ, निलेश शिंगाडे, सागर वाघमोडे, वैशाली जाधव, स्वाती शिंगाडे, पोलीस पाटील उषा वाघमोडे, मंगल वाघमोडे, सुरेखा जाधव,लक्ष्मण शिंगाडे, राहुल जाधव,आबा पाटील, भागवत भुजबळ, शिवाजी शिंगाडे, नितीन जाधव,मनोहर शिंगाडे, श्रवण जाधव, गुलाबराव वाघमोडे, शब्बीरभाई सय्यद, दिलावर शेख, बबन शिंगाडे, नाना जाधव, तात्यासो शिंगाडे, लखन भिंगारदिवे, वसंत कणसे, हगारे गुरुजी येवले गुरुजी व वालचंदनगर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष शेळगाव चे बीट हवालदार चांदणे साहेब आदी मान्यवर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, अधिकारी, पदाधिकारी व प्रगतशील बागायतदार तसेच पंचशील बुद्ध विहार प्रतिष्ठानचे सर्व मेंबर्स, सर्व समाज बंधू व भगिनी व गावातील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# पंचशील विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**हदगांव । चंद्रकांत भोरे**

शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.संस्थेचे संचालक जगदीश कदम यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले.संचालक जगदीश कदम,कोषाध्यक्ष शिवाजीराव तावडे, प्राचार्य अनिल दस्तूरकर,मुख्याध्यापकअजय काबरा,पर्यवेक्षक जाधव,बेळकुंदे,शाळा प्रशासन प्रमुख संदीप ढोले,वसतिगृह व्यवस्थापक राजेश तुपकरी,सायन्स अकॅडमीचे आफ्रोज सर सह शाळेतील शिक्षक,मॅडम,प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आदिच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा फुले,आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज,महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष दिवंगत माजी खासदार हरिहरराव सोनुले,संस्थेच्या माजी उपाध्यक्षा दिवंगत श्रीमती अंजनाबाई सोनुले,संस्थेचे संस्थापकीय सचिव दिवंगत रघुनाथराव जोंधळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले,त्रिशरण पंचशील घेऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली.

आपल्या प्रास्ताविकातून मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर,श्रीमती पूजा जंगवाड,अमररत्न वाढवे,यांनी बाबासाहेबांच्या कार्याला उजाळा दिला तर श्रीमती सारिका बारसे यांनी डॉ.बाबासाहेबांच्या विविध कार्याला उजाळा देत चवदार तळ्याचा सत्याग्रह प्रेक्षकांच्या डोळ्यासमोर उभा करून अभिवादन केले.

याप्रसंगी संस्थेचे सचिव सुनील हरिहरराव सोनुले यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी सर्वांच्या वतीने दिल्या

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनार्दन देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक अरविंद जाधव यांनी केले, अल्पोपहारनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



## आंतरजिल्हा दुचाकी चोरट्यांच्या टोळीला वालचंदनगर पोलिसांनी ठोकल्या बेड्या; ३.५६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**शेळगाव । प्रतिनिधी**

राहुल जाधव दि. १४ वालचंदनगर पोलिसांनी मोठी कारवाई करत आंतरजिल्हा स्तरावर दुचाकी चोरी आणि घरफोडी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ५ मोटारसायकल आणि सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. इंदापूर-बारामती रोडवरून काही संशयित आरोपी जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी गोतंडी (ता. इंदापूर) गावाच्या परिसरात सापळा लावून दोघांना ताब्यात घेतले. त्यांची सखोल चौकशी केली असता, त्यांनी विविध जिल्ह्यांत गुन्हे केल्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेले आरोपी: १) महेश उर्फ मावड्या मंगेश काळे (वय २४, रा. बाभुळगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर)२) पंकज गुरूपत पवार (वय २४, रा. मांगी, ता. करमाळा, जि. सोलापूर) पोलिसांनी केलेल्या तपासात या टोळीने वालचंदनगर, दौंड, जेजुरी, सोलापूर आणि करमाळा पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोटारसायकल चोरी, घरफोडी आणि जबरी चोरीचे अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपींकडून चोरीच्या ५ मोटारसायकल आणि चोरीतील ३ ग्रॅम सोने असा एकूण ३ लाख ५६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.वालचंदनगर पोलिसांनी केलेल्या या धडाकेबाज कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त केले जात असून, या टोळीकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



सदरची कामगिरी ही मा. संदीप सिंह गिल्ल पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण मा. गणेश बिरादार सो अप्पर पोलीस अधीक्षक बारामती विभाग, मा. डॉ. सुदर्शन राठोड उपविभागीय पोलीस अधिकारी बारामती विभाग व प्रमोद शिरसागर पोलीस निरीक्षक ठाणे गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सपोनि राजकुमार डुनगे स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि. कुलदीप संकपाळ, पोउपनिरी. विजय टेळकिकर, बाळासाहेब कारंडे, सपोफौ. रवींद्र पाटमास, पोलीस हवालदार शैलेश स्वामी गुलाबराव पाटील कीर्ती लाल गायकवाड स्वप्निल अहिवळे अभिजीत एकशिंगे निलेश शिंदे व पोलीस अंमलदार विक्रम सिंह जाधव गणेश वानकर रणजीत देवकर यांनी केली.

## वर्षांचा अन्याय अखेर असह्य: मोबदल्या साठी धडपडणाऱ्या ५ आदिवासी शेतकऱ्यांचा SDO कार्यालयात विषप्राशनाचा प्रयत्न

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**चंद्रपुर । सिद्धेश्वर केंद्रे**

चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना तालुक्यातील कुसुंबी येथील पाच आदिवासी शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात संतापजनक पाऊल उचलत थेट उपविभागीय अधिकारी (डऊज) कार्यालयातच विषप्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि. १३ एप्रिल) घडली. या घटनेने संपूर्ण जिल्हा हादरला असून प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

माणिकगड (अल्ट्राटेक) सिमेंट कंपनीच्या चुनखडी प्रकल्पासाठी कुसुंबी येथील कोलाम आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी तब्बल १५ वर्षांपूर्वी अधिग्रहित करण्यात आल्या होत्या. मात्र, या जमिनींचा योग्य मोबदला आजपर्यंत देण्यात आलेला नाही. मोबदला द्या अन्यथा जमिनी परत करा या मागणीसाठी शेतकरी गेल्या दीड दशकापासून प्रशासनाचे उंबरठे



झिजवत आहेत.

वारंवार निवेदने, पाठपुरावे, आंदोलन करूनही न्याय मिळत नसल्याने संतप्त व हतबल झालेल्या या पाच शेतकऱ्यांनी अखेर थेट डऊज कार्यालय गाठले. उपविभागीय अधिकारी रवींद्र माने यांच्यासमोर आपली व्यथा मांडताना अचानक त्यांनी विषप्राशन केले. हा प्रकार समोर येताच कार्यालयात एकच गोंधळ उडाला.

घटनेची माहिती मिळताच राजुरा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाचही शेतकऱ्यांना राजुरा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना तातडीने चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.


या घटनेमुळे प्रशासनाच्या दिरंगाईवर संताप व्यक्त होत असून, आदिवासी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तात्काळ ठोस निर्णय घेण्याची मागणी जोर धरत आहे. न्यायासाठी जीव द्यावा लागतो का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# कर्जमाफीची घोषणा हवेतच ; बळीराजा संकटात बँकांचा तगादा, व्याजांचा बोजा वाढण्याची भीती

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

राज्यासह देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांना राज्य शासनाने या वर्षाच्या अर्थसंकल्पात मोठ्या गाजावाजात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली.

अद्याप या योजनेचा अधिकृत शासन निर्णय निर्गमित झालेला नाही. त्यामुळे राज्यासह तालुक्यातील लाखो शेतकरी संभ्रमात असून, कर्ज भरायचे की कर्जमाफीची वाट पाहायची अशा पेचात शेतकरी अडकले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे दोन लाख रुपये पर्यंतचे थकीत पीक कर्ज माफ करण्याची घोषणा दि. ६ मार्च रोजी केली होती. मात्र या घोषणेचे रूपांतर जोपर्यंत शासन निर्णयात होत नाही. तोपर्यंत बँकाकडे कर्जमाफीची कोणतीही अंमलबजावणी प्रक्रिया सुरू होऊ शकत नाही.दि. ३० मार्चला ही लेखी आदेश नसल्याने बँकांनी



शेतकऱ्याकडे कर्ज वसुलीसाठी दगादा लावला आहे. जर दिनांक ३१ मार्च पर्यंत कर्जाचे नूतनीकरण किंवा परतफेड झाली नाही, तर सवलतीच्या व्याजदर संपून शेतकऱ्यावर अधिक व्याजाचा बोजा पडू शकतो. जुने कर्ज थकीत राहिल्यास पुढील खरीप हंगामासाठी नवीन पीक कर्ज मिळण्यात अडचणी येऊ शकतात. नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान जाहीर झाले आहे पण त्यांच्या अटी शर्तींचा शहानादेश नसल्याने तेही अंधातरीच आहे. त्यामुळे शेतकरी संकटात सापडलेला आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकत्याच दिलेल्या माहितीनुसार, कर्जमाफीच्या प्रक्रियेसाठी बँकेमार्फत माहिती संकलित करण्याचे काम सुरू असून दि. ३० जून पूर्वी प्रत्यक्ष लाभ देण्याचे नियोजन असल्याचे सांगितले.

परंतु 'घोषणा झाली पण अध्यादेश नाही या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांत तीव्र संताप व्यक्त होत आहे. शासनाने तातडीने शासनाधीश काढून ३१ मार्चची मुदत वाढवून द्यावी किंवा बँकांना वसुली थांबविण्याचे आदेश द्यावेत जेणेकरून शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही. अशी मागणी देगलूर तालुक्यातील शेतकऱ्याकडून होत आहे.

**कर्ज भरावी की वाट पहावी ?शेतकऱ्यापुढे पेज**

३१ मार्चला संपला तरी शासनाने प्रत्यक्षात कर्जमाफीचा शासन निर्णय काढला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. ३१ मार्च रोजी पिक कर्ज भरण्याची शेवटची तारीख होती ती उलटली. त्यामुळे कर्ज फेडावे की कर्जमाफीच्या जीआर ची वाट पाहावी? असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा टाकला आहे.

**नियमित कर्जदारांची काय?**

ज्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्ज फेडले आहे, त्यांच्यासाठी ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहन पर अनुदानाची घोषणा झाली आहे. मात्र ३१ मार्च च्या आत नवीन कर्ज काढण्यासाठी जुन्या कर्जाची विल्हेवाट लावणे गरजेचे असल्यामुळे हे शेतकरी सध्या आर्थिक ओढाताण सहन करीत आहेत.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नायगाव शहरात अन्नदानाचे वाटप

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**नायगाव । प्रतिनिधी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त, मिलिंद बच्चाव.सतिष वाघमारे.प्रकाशभाऊ हनमंते, साहेबराव कोपरेकर यांच्या वतीने

दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी नायगाव शहरातील मुख्य चौकात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण भव्य अन्नदान (खिचडी वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी नायगाव शहरासह तालुक्यातील कानाकोपऱ्यातून आंबेडकर अनुयायी व बहुजन बंधु भगिनींची सेवा घडावी म्हणुन हा उपक्रम सुरू करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आयोजकांचा होता.ना भाला ना बरची ना घाव पाहिजे, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजन आयोजन करण्यात आलेल्या या अन्नदान वाटप कार्यक्रमांचे उद्घाटन रामतिर्थ पोलिस स्टेशनचे साहाय्यक पोलिस निरीक्षक शिवराज नरवाडे यांच्या शुभ हस्ते १४



एप्रिल २०२६ रोज मंगळवार सकाळी १.०० वाजता आले आहे. यावेळी मंगेश हनवटे.नागोराव डूमणे.विलास बच्याव.संतोष भालेराव विनोद भालेराव.नागेश भालके प्रकाश कामळजकर.प्रल्हाद भालेराव.भिमराव हनमंते सोनू बच्याव. उपस्थितीत होते यावेळी बाबासाहेब अभिवादन म्हणून भिम शाहीर बाळासाहेब आव्हाड यांनी अप्रतिम अनेक भिम गिते गाउन उपस्थित भिमसैनिकाना मंत्रमुग्ध केले यावेळी शहरासह तालुक्यातील हजारो भिम अनुयायी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रकाशभाऊ हनमंते यांनी केले आहे.

## रोजगार हमी योजनेचे अनुदान रखडले शेतकरी चिंतेत

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**नवलसिंग इंगळे/ । चखली**

चिखली/ गेल्या वर्षी २०२५ अंतर्गत चिखली तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभ म्हणून सिंचन विहीर मंजूर करण्यात आल्या होत्या अनेक शेतकऱ्यांनी बँकेचे कर्ज काढून ह्या विहिरी खोदून पूर्ण केल्या परंतु गेले सहा महिने उलटून सुद्धा शेतकऱ्यांच्या हातावर कुठलीही शासनाची मदत आजपर्यंत मिळाली नाही त्यामुळे शेतकऱ्याच्या आर्थिक बोजा पडला आहे त्यामुळे शेतकरी हवाला दिल झाला आहे आणि कर्जबाजारी झाला आहे शासनाने विहिरीचे अनुदान लवकरात लवकर वितरित करावे अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे जर हे अनुदान लवकर मिळाले नाही तर याचा उद्रेक होऊ शकतो.

## प्रदूषणावर घणाघात!-मंत्री पंकजा मुंडे यांचा चंद्रपूर दौरा; उद्योगांना बसणार धक्का?

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**कोरपणा । पवन देरकर**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे या गुरुवारी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, जिल्ह्यातील वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर हा दौरा अत्यंत निर्णायक मानला जात आहे. औद्योगिक प्रदूषणामुळे त्रस्त झालेल्या चंद्रपूरकरांच्या अपेक्षा आता या दौऱ्याकडे लागल्या आहेत.या दौऱ्यात मंत्री मुंडे विविध औद्योगिक प्रकल्पांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करणार असून, प्रदूषणाच्या गंभीर स्थितीचा आढावा घेणार आहेत. संबंधित शासकीय अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेऊन कठोर उपाययोजनांवर चर्चा होणार असल्याची माहिती आहे. तसेच पशुपालकांच्या समस्या ऐकून त्यावर मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.



दौऱ्याचा सविस्तर कार्यक्रम:

सकाळी ११:०० – चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशन, दुर्गापूर येथे भेट

दुपारी १२:०० – बेलसणी येथे कोल वॉशरी पाहणी

दुपारी २:३० – झरपट/इरई नदी प्रदूषणाची पाहणी

दुपारी ४:०० – गडचांदूर येथे आगमन

सायंकाळी ५:०० – अल्ट्राटेक सिमेंट, मानिकगड येथे भेट

सायंकाळी ६:०० – बॉटनिकल गार्डन, विसापूर येथे कार्यक्रम

रात्री ७:३० – ताडोबा राष्ट्रीय उद्यान कडे प्रस्थान

जिल्ह्यातील प्रदूषणग्रस्त भागांना थेट भेट देत नागरिकांशी संवाद साधण्यावर भर देण्यात येणार आहे. या दौऱ्यातून उद्योगांवर कडक कारवाई होण्याची शक्यता व्यक्त होत असून, चंद्रपूरच्या प्रदूषण समस्यांवर ठोस निर्णय होण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933